# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक ८ मार्च, २०१७
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ३)**

(१) **श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"तालब चौक, कोंढवा बुद्रुक (जि.पुणे) येथील ॲव्हेन्यु गृहसंकल्प इमारतीमधील 'बेक्स-एन-केक्स' या बेकरीस दि. ३० डिसेंबर, २०१६ रोजी लागलेल्या भीषण आगीत सहा कामगारांचा गुदमरुन झालेला मृत्यू, बेकरी मालकाच्या निष्काळजीपणामुळे सदरहू घटना घडणे, बेकरीसाठी आवश्यक असलेला अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना बेकरीकडे नसल्याचे निदर्शनास येणे, सदर प्रकरणी कोंढवा पोलीसांनी तीन भागीदार मालकांवर गुन्हा दाखल करण्यात येवूनही अद्याप त्यांच्या विरुध्द कोणतीच कारवाई न करता प्रकरण दडपविण्याचा घडलेला प्रकार, मृत कामगारांच्या कुटुंबियांना देखील अद्याप कोणतीही आर्थिक मदत देण्यात न आल्याने मृत कामगारांच्या कुटुंबियांमध्ये पसरलेला असंतोष, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.''

(२) **सर्वश्री. अतुल भातखळकर, विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अमर काळे, कु. प्रणिती शिंदे, प्रा. वर्षा गायकवाड, श्रीमती निर्मला गावित, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. अस्लम शेख, अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, डॉ. संतोष टारफे, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. मो.आरिफ नसीम खान, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, कालीदास कोळंबकर, पृथ्वीराज चव्हाण, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. संग्राम जगताप, जयकुमार गोरे, बाळासाहेब थोरात, संग्राम थोपटे, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, श्रीमती दिपिका चव्हाण,**

**सर्वश्री. वैभव पिचड, प्रदीप जाधव-नाईक, सुनिल प्रभू, हनुमंत डोळस, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. नरेंद्र पवार, संजय केळकर, प्रशांत ठाकूर, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर.तमिल सेल्वन, सर्वश्री. हसन मुश्रीफ, ॲड. वारीस पठाण, सर्वश्री. दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, पांडुरंग बरोरा, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. प्रशांत बंब, शेख आसिफ शेख रशीद, दत्तात्रय भरणे, भारत भालके, एकनाथराव खडसे-पाटील, अबु आझमी, सय्यद इम्तीयाज जलील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"रुग्णांच्या उपचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तूंची विक्री छापील दरापेक्षा वाढीव दराने केल्याबद्दल मुंबईतील लीलावती, फोर्टीज, कोकिलाबेन अंबानी, एशियन हार्ट, ग्लोबल, हिरानंदानी व सर एच. एन. हॉस्पिटल या नामांकीत खाजगी रुग्णालयांवर शासनाच्या वैध मापनशास्त्र विभागाकडून माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आलेली कारवाई, वैध मापनशास्त्र अधिनियमातील तरतुदीनुसार वस्तूंवर आयातदाराचे नाव, महिना व वर्ष, ग्राहक सेवा क्रमांक, विक्री किंमत, उत्पादन महिना यासारख्या गोष्टींची माहिती छापील स्वरुपात असणे बंधनकारक असतानाही त्याची अंमलबजावणी न होणे, तसेच रुग्णालयात उपचारासाठी वापरण्यात येणा-या बलून डिव्हाईस, एंजिओग्राफीक कॅथ्रेटर, युरेटीक युरोवर्ल्ड, आयवी कॅथ्रेटर, गाइड वायर, ब्रेथिक सर्किट, हॅनसॅन ग्लोव्हज, ब्लड कलेक्टर, स्टेंट अशा वस्तू वाढीव दराने विकल्यामुळे रुग्णांची केली जात असलेली लुट, त्यामुळे या रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमित देशमुख, अमर काळे, अब्दुल सत्तार, मो.आरिफ नसीम खान, अमीन पटेल नितेश राणे, सुनिल प्रभू, शरद सोनावणे, पृथ्वीराज चव्हाण, कु. प्रणिती शिंदे, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड.यशोमती ठाकूर, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, प्रा. विरेंद्र जगताप, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. विजय औटी, राहुल बोंद्रे, किसन कथोरे, संदीप नाईक, बळीराम सिरसकर, जितेंद्र आव्हाड, सरदार तारासिंह, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, पांडुरंग बरोरा, हसन मुश्रीफ, अबु आझमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"दापोडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील हरिहर कंम्पाऊंड मधील प्लास्टीकच्या दाण्यांपासून मोती बनविणाऱ्या देढीया प्लास्टीक या कारखान्यातील रसायनांच्या साठ्यास दिनांक १९ फेब्रुवारी, २०१७ रोजी शॉर्टसर्कीटमुळे लागलेल्या आगीत ४ कामगारांचा

होरपळून झालेला मृत्यु व अन्य दोन कामगार गंभीररित्या जखमी होणे, तसेच याच तालुक्यातील मु.पो.अनगाव येथील उदबत्ती व तीळापासून तेल तयार करणाऱ्या पितांबरी कारखान्यास लागलेल्या आगीत लाखो रुपयांचे झालेले नुकसान, तसेच अहमदनगर येथील एम.आय.डी.सी. परिसरातील सनफार्मा कंपनीत स्फोट होऊन लागलेल्या आगीत दोन कामगारांचा झालेला मृत्यु, सदर कारखान्यांनी कामगारांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही उपाययोजना केली नसल्यामुळे कामगारांचा झालेला मृत्यु, याबाबत कामगार आयुक्तांनी वेळोवेळी पाहणी करुन कामगारांच्या सुरक्षेबाबत कंपनीच्या व्यवस्थापनेला कळविणे आवश्यक असतानाही त्याकडे केलेले दुर्लक्ष, मृत कामगारांच्या सुरक्षेची काळजी न घेणाऱ्या कंपनीच्या मालकांवर गुन्हा दाखल करुन मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**चार : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस).**

**पाच : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७.

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, संजय कदम, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. दिपक चव्हाण, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, संदिप नाईक, अबु आझमी, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, राहुल मोटे, सुरेश लाड, हसन मुश्रीफ, पांडुरंग बरोरा, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश *उर्फ* बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(२)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, संजय कदम, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. दिपक चव्हाण, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, संदिप नाईक, अबु आझमी, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, श्रीमती दिपिका चव्हाण, विजय वडेट्टीवार, राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, राहुल मोटे, सुरेश लाड, हसन मुश्रीफ, पांडुरंग बरोरा, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ – महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश *उर्फ* बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ७ मार्च, २०१७

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.